**जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती सन-२०२३ अंतर्गत**
**कनिष्ठ लेखाधिकारी गट-क या पदावर दिलेल्या नियुक्तीस**
**हजर होणेसाठी मुदत वाढ देणेबाबत...**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर,अर्थ विभाग**
**आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/५०८/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक २५/०३/२०२६**

वाचाः- १. मा. अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडील मंजूर निवड सूची दिनांक १२/०७/२०२४

२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र.कार्या-१/आस्था-१/६१/२०२६ दिनांक १७/०२/२०२६

३. श्री जिवन उत्तमसिंग राजपुत यांचेकडील कनिष्ठ लेखाधिकारी गट-क पदावर दिलेल्या नियुक्तीस हजर होणेसाठी मुदतवाढ देणेबाबतचा दिनांक ०९/०३/२०२६ रोजीचा विनंती अर्ज

४. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,अधिसूचना दिनांक २१ जून २०२१ मधील अ.क्र.२(ड)(२).

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ला अनुसरून संदर्भ २ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडील नियुक्ती आदेश क्र.कार्या-१/आस्था-१/६१/२०२६ दिनांक १७/०२/२०२६ अन्वये प्रतीक्षा सूचीवर असलेले श्री जिवन उत्तमसिंग राजपुत यांना कनिष्ठ लेखाधिकारी या पदावर पंचायत समिती कोपरगाव जिल्हा परिषद अहिल्यानगर या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित करणेत आलेला आहे. प्रस्तुत आदेशातील अट क्र.१२ नुसार संबंधिताने नियुक्तीच्या ठिकाणी ३० दिवसांत हजर होणे क्रमप्राप्त होते.

तथापी संदर्भ क्र.३ नुसार सादर विनंती अर्जानूसार व संदर्भ क्र.४ मधील तरतुदीनुसार श्री जिवन उत्तमसिंग राजपुत यांना कनिष्ठ लेखाधिकारी या पदावर नियुक्तीचे ठिकाणी रूजु होणेसाठी त्यांचे मागणीप्रमाणे १५ दिवसांची मुदतवाढ देणेत येत आहे.

वरील प्रमाणे नोंद कार्यालय प्रमुख यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.तसेच उपरोक्त आदेशाचे काटेकोर पालन व पुर्तता करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.२०२६०३२५०५००९३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 24-03-2026 13:27:15
आनंद भंडारी(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रती

श्री जिवन उत्तमसिंग राजपुत मु.सटाणा,पो. जांबरगाव,ता.वैजापुर ,जि. छत्रपती सांभाजीनगर,पिन.४२३७०१

प्रत-मा. अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांना महितीस्तव स. सादर

प्रत-मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत-उपमुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि),जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत-गटविकास अधिकारी,पंचायत समिती कोपरगाव,ता. कोपरगाव,जि. अ. नगर

२/- संबंधित नियुक्त उमेदवारास नियमानुसार हजर करून घेणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. तसेच संबंधितांच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी करावी व तदनंतरच संबंधितास रिक्त पदावर हजर करून घ्यावे. संबंधितांचा रूजु अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.